# जी- हुजूरी नको, कामाला न्याय द्या !

## सीईओ वैभव वाघमारे यांनी अधिकारी, कर्मचाऱ्यांना सुनावले खडेबोल




**वाशीम**, दि. ७ (प्रतिनिधी)

जी हुजूरी करणारे नाही तर कामाला प्राधान्य देणारे अधिकारी- कर्मचारी पसंद असल्याचे स्पष्ट मत आपल्या अधिनस्त कर्मचाऱ्यांसमोर मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे यांनी व्यक्त केले.

जिल्हा परिषदेचे प्रसासन अधिक लोकाभिमुख आणि सुरळीत चालण्याच्या दृष्टीने वाघमारे यांनी ५ मार्च रोजी वसंतराव नाईक सभागृहात सकाळी बैठक घेऊन जि. प. मुख्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी वेळेचे बंधन पाळणे, कार्यालयीन नस्तीबाबतचे नियम, चांगले अधिकारी- कर्मचारी कोण याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. जिल्हा परिषदेमध्ये काम करतांना ओळख अथवा हितसंबंध न पाहता कर्तव्याशी प्रामाणिक राहाण्याचा सल्ला त्यांनी दिला. संबंध जोपासण्यासाठी काम करु नका, काम करुन संबंध जोपासा. ज्या कामाचा आपल्याला पगार मिळतो, मान- सन्मान मिळतो त्याचे स्मरण करुन आणि पगाराला अनुसरुन काम करण्याचे निर्देश कर्मचाऱ्यांना दिले. जिल्हा परिषद हे आपले कुटुंब असून एकत्र काम (टिम वर्क) करणे, येणाऱ्या सुख- दुःखाची बाहेर वाच्यता न करता ते एकत्र सोसणे हे चांगल्या कुटुंबाचे लक्षण असल्याचे ते म्हणाले. ज्या सुचना जि. प. मुख्यालयासाठी दिल्या त्या सर्व पंचायत समिति आणि ग्राम पंचायतीसाठी लागु राहतील असेही त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, अधिकारी, कर्मचाऱ्यांनी वेळेचे बंधन पाळण्याचे निर्देश देताना सीईओ वाघमारे म्हणाले की, अधिकारी व कर्मचारी यांनी सकाळी ९३ ४५ वाजेपर्यंत कार्यालयाच्या मुख्य प्रवेश द्वाराच्या (गेट) आत येणे बंधनकारक राहिल. अति महत्वाच्या घरगुती कामामुळे अथवा अपवादात्मक परिस्थितीत कार्यालयात येण्यास विलंब होणार असल्यास ९.३०वाजण्यापूर्वी विभाग प्रमुखांनी सीईओ यांना वैयक्तिकरित्या व ईतर अधिकारी कर्मचारी यांनी जि. प. मुख्यालय या व्हाट्सअप ग्रुपवर कारणांसह कळवावे. असे केल्यास संबंधितांना कार्यालयात ३० मि. उशिरा येण्याची मुभा मिळेल. परंतु कार्यालयात येण्यासाठी 30 मिनिटांपेक्षा अधिक वेळ लागत असेल तर अर्ध्या दिवसाची रजा टाकण्याचे निर्देशित करण्यात आले. तर जि. प. मध्ये किंवा इतर सर्व बैठकांसाठी वेळेच्या ५ मि. आधीच उपस्थित रहावे. ज्या विभागाची मिटींग आहे त्या विभागाच्या कार्यालयीन अधिक्षकांनी १५ मि. आधीच सभागृहाची चोख व्यवस्था ठेवावी. कार्यालयाचे कोणतेही काम करण्यासाठी कर्मचारी आणि विभाग प्रमुख यांनी एक डेड लाईन (काल मर्यादा) निश्चित करुन त्यानुसार ते काम पूर्ण करण्याची ताकीद सीईओ वाघमारे यांनी दिली. तर कारवाई करणे आवडत नसले तरी कामात कुचराई करणाऱ्यांची गय पण केली जाणार नसल्याचे सांगताना केलेली कारवाई कुठल्याही परिस्थितीत माघारी घेणार नाही असेही वाघमारे ठामपणे म्हणाले.

### प्रशासकीय कारवाईची नाविण्यपूर्ण पद्धत

**अधिकारी व कर्मचाऱ्यांवरील किरकोळप्रशासकीय कारवाईसाठी सीईओ वाघमारे यांनी नाविन्यपूर्ण व प्रभावी पध्दतीचा अवलंब केला आहे. जर कर्तव्यातली कसूर, किरकोळ प्रशासकीय कारवाई असेल, तर प्रत्यक्षात प्रशासकीय कारवाई करण्यापूर्वी संबंधिताला एक संधी म्हणून (त्याची इच्छा असल्यास) जिल्हा परिषदेच्या जवळजवळ २०० पेक्षा जास्त कर्मचाऱ्यांचे सभेसमोर, झालेल्या कसुराबाबत चुक कबुल करीत स्वईच्छेने माफी मागितल्यास त्याच्यावर प्रशासकीय कार्यवाही न करता त्याला सुधारण्याची संधी देण्यात येईल.**

लोकमत

# कारवाई करणे आवडत नाही; पण कुचराई केल्यास गय नाही!

## जिल्हा परिषद सीईओंचा अधिकारी-कर्मचाऱ्यांना इशारा

लोकमत न्यूज नेटवर्क

**वाशिम :** जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायतच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांनी कार्यालयीन वेळेचे बंधन पाळून कामाला प्राधान्य द्यावे असे सांगतानाच, आपणास कारवाई करणे आवडत नाही; परंतु कामात कुचराई करणाऱ्यांची गय केली जाणार नाही, असा इशारा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) वैभव वाघमारे यांनी ५ मार्चला दिला.

जिल्हा परिषदेचे प्रशासन अधिक लोकाभिमुख आणि सुरळीत चालण्याचे दृष्टीने सीईओ वाघमारे यांनी ५ मार्चला जिल्हा परिषद सभागृहात बैठक घेऊन जि. प. मुख्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांशी संवाद साधला. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी किरण गणेश कोवे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी दिनकर जाधव, उपमुख्य कार्यकारी अधिकारी सर्वश्री यशवंत सपकाळे, दिगंबर लोखंडे व संजय जोल्हे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुहास कोरे, बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता आनंद राजुरकर, ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता अजिंक्य वानखेडे यांची प्रमुख उपस्थिती होती.



### संगणक हाताळणी आवश्यक

नियुक्तीच्या वेळी एमएस-सीआयटी प्रमाणपत्र सादर करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना संगणकावर काम करता येणे अपेक्षित आहे. ज्यांना सराव नसेल त्यांनी पुढील एका महिन्याच्या आत वर्ल्ड, एक्सल, पीपीटी आणि गुगल शिट यामध्ये काम करण्याची तयारी ठेवावी, असे निर्देशही वाघमारे यांनी दिले.

यावेळी सीईओ वाघमारे यांनी अधिकारी-कर्मचाऱ्यांनी नेमके काय करावे आणि काय टाळावे यावर सविस्तर भाष्य केले. वेळेचे बंधन पाळणे, कार्यालयीन नस्तीबाबतचे नियम, चांगले अधिकारी-कर्मचारी कोण याबाबत विचार मांडले. जिल्हा परिषदेमध्ये काम करताना ओळख अथवा संबंध न पाहता कर्तव्याशी प्रामाणिक राहण्याचा सल्ला त्यांनी दिला.

संबंध जोपासण्यासाठी काम करु नका, तर काम करुन संबंध जोपासा. ज्या कामाचा पगार मिळतो, मान-सन्मान मिळतो त्याचे स्मरण करुन आणि पगाराला अनुसरून काम करा असे खडे बोलही त्यांनी सुनावले. आपणास कारवाई करणे आवडत नाही, परंतु कामात कुचराई करणाऱ्यांची गय पण केली जाणार नाही आणि एकदा केलेली कारवाई कुठल्याही परिस्थितीत माघारी घेणार नाही, असे सांगत मला 'जी हुजूरी' करणारे नाही तर कामाला प्राधान्य देणारे अधिकारी- कर्मचारी पसंद आहेत असेही त्यांनी स्पष्ट केले.

# कामाला प्राधान्य देण्याचे सिईओंचे अधिकारी, कर्मचाऱ्यांना निर्देष

देशोन्नती वृत्तसंकलन...

**वाशिम** ■ मला जी हुजूरी करणारे नाही तर कामाला प्राधान्य देणारे अधिकारी- कर्मचारी पसंद आहेतअ असे स्पष्ट मत आपल्या अधिनस्त कर्मचार्यांहसमोर मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे यांनी व्यक्त केले. जिल्हा परिषदेचे प्रसासन अधिक लोकाभिमुख आणि सुरळीत चालण्याच्या दृष्टीने वाघमारे यांनी ५ मार्च रोजी वसंतराव नाईक सभागृहात सकाळी १० वा. बैठक घेऊन जि. प. मुख्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांशी संवाद साधला. यावेळी जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी किरण कोवे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी दिनकर जाधव, सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी यशवंत सपकाळे, पंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी दिगंबर लोखंडे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुहास कोरे, बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता राजुस्कर, महिला व बालकल्याण विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी संजय जोल्हे आणि ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता अजिंक्य वानखेडे यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी त्यांनी वेळेचे बंधन पाळणे, कार्यालयीन नस्तीबाबतचे नियम, चांगले अधिकारी- कर्मचारी कोण याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. जिल्हा परिषदेमध्ये काम करतांना ओळख अथवा हितसंबंध न पाहता कर्तव्याशी प्रामाणिक राहाण्याचा सल्ला त्यांनी दिला. संबंध जोपासण्यासाठी काम करु नका, काम करुन संबंध जोपासा. ज्या कामाचा आपल्याला पगार मिळतो, मान- सन्मान मिळतो त्याचे स्मरण करुन आणि पगाराला अनुसरुन काम करण्याचे निर्देश कर्मचाऱ्यांना दिले जिल्हा परिषद हे आपले कुटुंब असून एकत्र काम करणे, येणाऱ्या सुख- दुःखाची बाहेर वाच्यता न करता ते एकत्र सोसणे हे चांगल्या कुटुंबाचे लक्षण असल्याचे ते म्हणाले. ज्या सुचना जि. प. मुख्यालयासाठी दिल्या त्या सर्व पंचायत समिती आणि ग्राम पंचायतीसाठी लागु राहतील असेही त्यांनी स्पष्ठ केले.

प्रशासकीय कारवाईची नाविन्यपूर्ण आणि प्रभावी पध्दतः
अधिकारी व कर्मचारी यांच्यावरील किरकोळ प्रशासकीय कारवाईसाठी सीईओ वाघमारे यांनी नाविन्यपूर्ण व प्रभावी पध्दतीचा अवलंब केला आहे. जर कर्तव्यातली कसूर, किरकोळ प्रशासकीय कारवाई असेल, तर प्रत्यक्षात प्रशासकीय कारवाई करण्यापूर्वी संबंधिताला एक संधी म्हणून (त्याची इच्छा असल्यास) जिल्हा परिषदेच्या जवळजवळ २०० पेक्षा जास्त कर्मचारी यांचे सभेसमोर, झालेल्या कसुराबाबत चुक कबुल करीत स्वईच्छेने माफी मागितल्यास त्याच्यावर प्रशासकीय कार्यवाही न करता त्याला सुधारण्याची संधी देण्यात येईल.
आपणास कारवाई करणे आवडत नाही पण कामात कुचराई करणाऱ्यांची गय पण केली जाणार नाही आणि एकदा केलेली कारवाई कुठल्याही परिस्थितीत मागे घेणार नाही असेही वाघमारे ठामपणे म्हणाले.